IJNRD.ORG ISSN : 2456-4184
INTERNATIONAL JOURNAL OF NOVEL RESEARCH AND DEVELOPMENT (IJNRD) | IJNRD.ORG
An International Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# बहुजनांच्या शैक्षणिक चळवळीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान

संशोधक
**हनुमान शिवाजी मोरे**
इतिहास विभाग,
चिश्तीया कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्स आणि कॉमर्स, खुलताबाद.
जि. छत्रपती संभाजीनगर
Email: Hanumanmore10@gmail.com

मार्गदर्शक
**प्रा. डॉ. गोपालसिंग बच्छीरे**
सिध्दार्थ महाविद्यालय, जाफ्राबाद,
जि. जालना
Email: bachire4@gmail.com

**गोषवारा**

प्रस्तुत संशोधन लेखामध्ये मराठवाडा आणि बहुजन तथा दलित आणि मागासवर्गीय समाजाच्या शिक्षणाची स्थिती काय होती याचा अभ्यास करण्यात आलेला आहे. त्या काळातील शैक्षणिक स्थितीत काय बदल झाले. त्यासाठी मराठवाडा विभागात कोणी-कोणी प्रयत्न केले या गोष्टीचा अभ्यास करणे हेच उद्दिष्ट समोर ठेवून हा संशोधन विषय सादर करण्यात आला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांचे समकालीन लोक नेत्यांनी समाजासाठी काय योगदान दिले का? याचा अभ्यास संशोधन लेखात करण्यात आलेला आहे. मराठवाड्यातील सामान्य माणसांचा सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक आणि शैक्षणिक विकास होण्यासाठी शिक्षणाचे काय महत्व आहे हे प्रस्तुत संशोधन लेखातून मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**Keyword** : दलित, मागासवर्गीय, शैक्षणिक चळवळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**प्रस्तावना**

मराठवाड्यातील बहुजनाच्या शिक्षण चळवळीचा अभ्यास करताना आपल्या असे लक्ष्यात येते की, निजाम काळापासून मराठवाड्यातील बहुजन दलित समाज हा अशिक्षित व शेतीशी निगडित कनिष्ट

व्यवसायातच दिसत होता. यांची मक्तेदारी होती; शिक्षण हे प्रस्थापित समाज व्यवस्थेतील उच्च वर्णीय यांची मक्तेदारी होती, परंतु आधुनिक कालखंडात ब्रिटिशांच्या शिक्षण व्यवस्थेतून निर्माण झालेल्या प्रभावामुळे महात्मा फुले व शाहू महाराजांच्या प्रेरणेने शिक्षण सर्व समाजासाठी खुले करण्यात आले. असे असले तरीसुद्धा एकूण मराठवाड्यात शिक्षण घेण्यावर बंधन होती. कारण तेथे निजामाच्या सरंजामी राजसत्तेचे आणि सामाजिक विषमता होती. या सर्व घटना बहुजनाच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय व शैक्षणिक विकासाला अडथळा निर्माण करत होत्या. पहिल्यांदा त्याला छेद देण्याचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले. निजामकालीन मराठवाड्यातील बहुजन एकूण विकासाची दारे शिक्षणाच्या माध्यमातून खुले केले. त्याच्या या कृतीमुळे मराठवाड्यात मिलिंद महाविद्यालयासारखा शैक्षणिक वटवृक्ष उभा राहिला. निजामाची सत्ता असताना दलितांच्या उन्नतीसाठी आवश्यक ती पाऊले उचलताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेले कार्य अजरामर आहे. बहुजनासाठी शिक्षणाची दारे उघडून त्यांच्या शिक्षणातील गैरसोय दूर केली.

**बहुजन शिक्षणातील चळवळीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान:**

माणसाच्या प्रगतीचे / विकासाचे, उन्नतीचे एकमेव साधन हे 'शिक्षण' आहे. शिक्षणामुळेच माणसात आत्मविश्वास निर्माण होतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितले होते की, उन्नतीची पहिली पायरी ही 'शिक्षण' आहे. म्हणूनच बहुजनाच्या शिक्षणाकडे त्यांनी अगदी प्रारंभापासूनच लक्ष दिलेले होते. डॉ. बाबासाहेब आबेडकरांच्या मते, 'उपासमारीने शरीराचे पोषण कमी झाल्यास माणूस हतबल होऊन अल्पायूषी होतो. तसेच शिक्षणाच्या अभावी तो निर्बुद्ध राहिल्यास जिवंतपणी दुसऱ्याचा गुलाम बनतो, तथापि हे शिक्षण आर्थिक दुरवस्थेमुळे बहुजन समाजातील लोक घेऊ शकत नाहीत. त्यासाठी शासनाने या समाजास विविध सवलती देऊन त्यांना शिक्षण घेण्यास साहाय्य करावे." डॉ. बाबासाहेब आबेडकरानी 'बहिष्कृत हितकरणी सभा' स्थापना करून सार्वजनिक जीवनाला सुरुवात केली. या सभेची स्थापनाच मुळात बहुजनांत शिक्षणाच्या प्रचारासाठी झाली होती. “विद्यार्थी वसतिगृहाद्वारे अगर अन्य साधनांद्वारे बहिष्कृत समाजात शिक्षणाचा प्रसार करणे, ठिकठिकाणी वाचनालये, शैक्षणिक वर्ग अथवा स्वाध्याय संघ उघडणे औद्योगिक व शेतीविषयक शाळा चालविणे" हे संस्थेचे ध्येय होते.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा बहुजनांच्या शिक्षणाचा शासनाला पाठपुरावा :**

ब्रिटिश मंत्रिमंडळात इ.स. १९२७ मध्ये विधिमंडळावर नियुक्ती झाल्यावर, त्यांनी सरकारला सुचित केले की, "सामान्य माणसाला शिक्षण सुलभ होईल अशी व्यवस्था केली पाहिजे. खालच्या

वर्गाला वरच्या वर्गाच्या पातळीवर आणण्यासाठी त्यांना सवलती दिल्या पाहिजेत." अर्थात डॉ. आंबेडकरांचे समानतेचे तत्वज्ञान अगदी स्पष्टं होते तसेच शिक्षण हेच समाज परिवर्तन महत्त्वापूर्ण माध्यमं आहे.

सामाजिक व आर्थिक न्याय प्रस्थापित झाला पाहिजे, त्यामुळे सर्व समूहांना शिक्षणाची समान संधी मिळाली पाहिजे, त्याना त्यांच्या इच्छेप्रमाणे उच्च शिक्षण प्राप्त करता यावे, यासाठी शासनाने योग्य ते पाऊले उचलावीत. हे शासनाचे परम कर्तव्यच आहे अशी डॉ. आंबेडकरांची भूमिका होती.

बहुजनांना शिक्षण का देण्यात यावे ? असा प्रश्न विचारला असता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणाचा मुख्य उद्देश स्पष्ट करताना ते म्हणतात की, "मी हिंदू समाजात सर्वात खालच्या स्तरातून आलेलो असल्यामुळे मला शिक्षणाचे मूल्य काय असते हे चांगलेच माहिती आहे. खालच्या स्तरातील (दलित) लोकांच्या उन्नतीची खरी समस्या आर्थिक समस्या आहे असे समजणे ही सर्वात मोठी चूक आहे. या स्तरातील लोकांच्या उन्नतीची समस्या सोडवणे म्हणजे त्यांचे भरण पोषण करून व कपडालत्ता देऊन त्यांना या देशाच्या प्राचीन आदर्शाप्रमाणे उच्च वर्गाचे सेवक बनवणे नव्हे. खरी समस्या तर निम्न स्तरातील (दलित) लोकांचा न्यूनगंड दूर करणे हा तो उपाय होय. त्यांची समस्या अशी आहे की, ज्यामुळे त्यांचा विकास खुंटला गेला आणि त्यांना इतरांचे गुलाम बनवले गेले, त्यांना स्तरीय समाजरचनेच्या व्यवस्थेने अत्यंत निघृणपणे लुबाडले. यांची त्यांना जाणीव करून देणे गरजेचे आहे. त्यांचे जगणे हे त्यांच्या स्वतःसाठी आणि त्यांच्या राष्ट्रासाठी आहे. याची त्यांना अर्थपूर्ण समज करून देणे आवश्यक आहे. उच्च शिक्षणाच्या प्रसाराशिवाय हा हेतू कधीही सफल होऊ शकत नाही, हाच आपल्या सामाजिक दुखण्यावरील रामबाण उपाय आहे असे माझे ठाम मत आहे".

**पीपल्सं एज्युकेशन सोसायटी :**

डॉ. आंबेडकर यांनी बहूजन समाजाला सांगितले की, पारंपारिक कामाचा त्याग करा त्याशिवाय तुम्हाला प्रतिष्ठा मिळणार नाही. त्यासाठी तुम्हाला प्रथम शिक्षण घ्यावे लागणार आहे, कारण शिक्षणामुळे तुम्हाला तुमच्या हक्काची व आत्मसन्मानाची जाणीव होईल तसेच प्रस्तापित समाजाचा दृष्टिकोन ही बदलेल बहुजनसमाजाला उद्देशून डॉ. आंबेडकर म्हणतात की, "मानाच्या आणि माक्याच्या जागा मिळवायच्या असतील तर त्यांना उच्च शिक्षण मिळणे गरजेचे आहे, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना वाटत होते." अस्पृश्य विद्यार्थ्यांना मुक्तपणे प्रवेश देणारी सवर्ण हिंदूची आणि शासनाची महाविद्यालये होती. हे निःसंशय खरे पण त्यांच्या स्वत्तःच्या पूर्वानुभवांनुसार त्यांची अशी खात्री झाली

होती. त्या परिसरातील वर्ण वर्चस्वाच्या वातावरणाने अस्पृश्य विद्यार्थ्यांची पूर्ण आणि नैसर्गिक वाढ कधीच होऊ शकत नाही. त्यांना महाविद्यालयाच्या उपक्रमात निर्वेधपणे भाग घेता येत नाही. त्यासाठी असे महाविद्यालय स्थापनेसाठी त्यांना सर्वच गोष्टीचे स्वातंत्र्य देणारे वातावरण निर्माण करण्यासाठीच पीपल्स एज्यूकेशन सोसायटीची स्थापना इ.स. १९४६ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केली."

**सिद्धार्थ महाविद्यालय :**

व्हाईसरॉयच्या मंत्रिमंडळात असल्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी 'सिद्धार्थ महाविद्यालयाकरिता तात्पुरत्या जागेसाठी 'मरीन लाईन्स' वर युद्ध परिस्थितीत बांधलेल्या हटमेन्टस (छपरी घरे) त्यांनी भाड्याने मिळविल्या. त्यावेळी महाविद्यालयात इंग्रजी बरोबरच संस्कृत, पाली, अर्धमागधी, उर्दू, पर्शियन, फ्रेंच, जर्मन, मराठी या विविध भाषांचा तसेच विज्ञानाच्या शाखा सर्वच विषयाचा अभ्यास सुरू केला. खेळ, सांस्कृतिक कार्यक्रम यामध्ये एका वर्षातच सिद्धार्थ महाविद्यालयाचे नाव मुंबई विद्यापीठात गाजू लागले. हे महाविद्यालय केवळ बहुजनांसाठीच नाही तर इतर सर्वच जातींसाठी खुले आहे असा खुलासा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केंद्रीय कायदे मंडळात असतांना केला होता." इ.स. १९४६ मध्ये महाविद्यालयाची सुरुवात झाली तेव्हा हजेरी पटावर 363 विद्यार्थी होते आणि त्यातील फक्त ६० विद्यार्थी हे बहुजन जातीमधील होते हे विशेषत्वाने नोंद घेण्याची बाब होती. मराठवाडा प्रांत निजाम संरजामी राजवटीत एकंदरीतच शिक्षणाच्या सुविधांचा अभाव होता. ती एकूण लोकसंख्येच्या तुलनेत अत्यंत कमीच होती. केवळ काही शहरं व तालुक्याच्या स्तरावरच शाळा होत्या. औरंगाबाद येथे फक्त एक इंटरमिडीयट कॉलेज होते. उच्च शिक्षण घेण्यासाठी हैद्राबादेत जाणे भाग होते. ही बहुजनांच्या आवाक्याबाहेरील गोष्ट होती.

**मक्रणपूर सभा आणि मराठवाडा**

जेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कन्नड तालुक्यातील मक्रणपूरला सभा घेतली. त्या सभेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर भाषण करताना म्हटले होते की, "हैद्राबाद संस्थानात शिक्षणाचा प्रसार हा अत्यंत मंद गतीने केला जात असून, निजाम सरकारने ज्या शाळा स्थापन केल्या आहेत. त्या लोकसंख्येच्या मानाने अत्यंत कमी आहेत. अशी टिका त्यांनी निजाम सरकारवर केली होती. निजाम हा बहुजनांना मोफत शिक्षण देत नाही तसेच त्यांना शिष्यवृत्तीही दिली जात नाही अशी खंत देखील व्यक्त केली होती. या तुलनेत कोल्हापूर, बडोदा या संस्थानांतील सरकारांनी बहुजन विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देऊन परदेशी शिक्षणाला पाठवितात; परंतु निजाम सरकारने एकाही बहुजन विद्यार्थ्यांना

शिष्यवृत्ती देऊन परदेशात शिक्षणासाठी पाठविलेले नाव्हते. हीच बाब डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी निदर्शनास आणून दिली. एवढे असूनही एक बहुजन विद्यार्थी बी.ए. झाला. त्याला तीन वर्षे प्रयत्न करून ही निजाम सरकारने नौकरी दिली नाही. हा फरक इतर संस्थाने व हैद्राबाद संस्थानात आहे हे चित्र त्यांनी दाखवून दिले होते. निजामाच्या प्रतिगामी धोरणावरही कठोर टीका केली होती.

२३ एप्रिल १९४१ तडवळे (ढोकी) येथील परिषदेतही त्यांनी हैद्राबाद, संस्थानांत बहुजनांसाठी साध्या प्राथमिक शिक्षणाचीही सोय नाही. बहुजनांना शिक्षणाची सर्वात जास्त गैरसोय कोठे असेल तर ती केवळ निजाम संस्थानात आहे, अशी परखड टिकाही केली होती. जेव्हा संस्थानात जनतेच्या जागृतीतून दबाव निर्माण झाला. इ. स. १९३५ च्या कायद्याने ब्रिटिश भारतात निवडणूका झाल्या. तेव्हा इ. स. १९३७ मध्ये संस्थानासह देशात राजकीय स्थित्यंतर झाले. काँग्रेसची बऱ्याच ठिकाणी मंत्रिमंडळे स्थापन झाली. निजामावर ही दबाव निर्माण झाला. त्यातून त्यांनी २०० 'मदरसे ए अर्जल अख्वाम' शाळा सुरु केल्या. त्याचेच नंतर 'पस्ता अख्वाम' असे नामकरण झाले. मराठवाड्यात औरंगाबाद, बीड, उस्मानाबाद व लातूर येथे या शाळा सुरू झाल्या. हैद्राबाद संस्थान भारतात विलीन झाल्यावरही मराठवाडा प्रदेश उच्च शैक्षणिक सुविधांच्या बाबतीतही तेवढाच मागास होता. जेव्हा डॉ. बाबासाहेब आबेडकरांना इ.स. १९४९ च्या दशकात उच्च शिक्षणाची सुविधा मराठवाड्यात असावी. याची नितांत गरज भासू लागली. उच्च शिक्षणातूनच समाजात नेतृत्व निर्माण होईल व समाजाची गुलामी नष्ट करता येईल असे मनापासून त्यांना वाटत असे.

**विविध महाविद्यालयाची स्थापना करण्याचा विचार:**

मनमाडच्या सत्कार समारंभात आंबेडकर म्हणाले होते की, "बहुजन समाज इतर कोणत्याही समाजापेक्षा अधिक राजकारण ज्ञानी समाज आहे. या बद्दल मला बिलकुल शंका नाही, कोणत्याही समाजातील उन्नती त्या समाजाच्या शिक्षणाच्या प्रगतीवर अवलंबून आहे. त्याचा एक भाग म्हणून मनमाड सभेत औरंगाबादला पी.ई.एस. चे महाविद्यालय काढण्याचा विचार त्यांनी बोलून दाखविला. हा विचार त्यांच्या मनात अनेक दिवसांपासून घोळत होता. पण ठिकाण निश्तिच ठरवले नव्हते. फक्त जेथे शिक्षणाची सुविधा नाही अशा 'मागास' भागात उच्च शिक्षणासाठीचे महाविद्यालय काढू. हे इ. स. १९४८ सालीच ठरविले होते, परतु महाविद्यालय नेमके कोणत्या शहरात काढावे हे नंतर ठरले. म्हणजे औरंगाबाद त्यांच्या डोळ्यापुढे होते. अहमदनगर हे बाबाहेबांच्या डोक्यात घोळत होते. डॉ. माईसाहेब आंबेडकर आपल्या आठवणीत लिहितात की, "वार्ताहाराच्या प्रश्नांना उत्तर देताना साहेबांनी

अहमदनगर येथे सिध्दार्थ कॉलेजच्या धर्तीवर आर्टस्, सायन्स कॉलेज सुरू करण्याचा मनोदय व्यक्त केला होता. अहमदनगरला कॉलेज सुरू करण्याविषयी अनेक वेळा चर्चाही झाल्या होत्या. त्या भागातील तडफदार कार्यकर्ते पी.जे. रोहम यांनीही धडपड केली होती. साहेबानी त्यांना त्यादृष्टीने जागेची पाहणी वगैरे करण्यास सांगितले होते ; परंतु पुढे काही प्रगती होऊ शकली नाही व नगरचे कॉलेज काही प्रत्यक्षात येऊ शकले नाही." अहमदनगरची योजना असफल झाल्यावर औरंगाबाद येथील महाविद्यालया संबंधांच्या हालचालीला वेग आला असावा; परंतु औरंगाबाद किंवा नागपूर येथे महाविद्यालय उभारण्याची चर्चा मात्र नगर योजनेच्या पुर्वीपासून होती हे निश्चित. श्री. आसाराम डोंगरे म्हणतात, "१८ डिसें १९४८ रोजी शेड्युल्ड कास्ट फेडरेशनच्या मराठवाड्यातील कार्यकत्यांचा मेळावा मुबईत आयोजित केला होता. या मेळाव्यास औरंगाबादहून भाऊसाहेब मोरे, आसाराम डोंगरे, टी.जी खरात, नारायण जाधव, दंडू किसनराव कांबळे, नामदेव पगारे, रायभान पारखे, जालन्याचे बन्सीलाल कुरील, परभणीचे माधवराव नेरळीवर, नादेडचे चोखोबा पहेलवान, उस्मानाबादचे आर. के. माने, प्रल्हादराव सरवदे, बाबूराव बनसोडे, बीडचे सीताराम जाधव आदींसह शेकडो कार्यकर्त उपस्थित होते. यावेळी विविध विषयांवर चर्चा झाल्यानंतर औरंगाबादेत आपले एखादे महाविद्यालय असावे अशी कार्यकत्यांनी मागणी केली. या पूर्वी पुष्कळ दिवसांपासून औरंगाबाद किंवा नागपूर या ठिकाणी महाविद्यालय सुरु करण्याचा विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मनात घोळत होता. त्यामुळे कार्यकर्त्यांनी अशी मागणी करताच बाबासाहेबांनी मी विचार करतो एवढेच सागीतले. नंतर डॉ. बाबासाहेब आबेडकरांनी महाविद्यालय औरगाबादेत होईल हे निश्चित केले. त्यासाठी जागेचा शोध घेण्यास कार्यकर्त्यांना सांगितले.

**निजामाकडून कर्ज काढून महाविद्यालय स्थापनेसाठीचे प्रयत्नः (मिलिंद कॉलेज)**

निजामाच्या मालकीची जमीन खाम नदीच्या काठावरील होती. चामडे कमावण्याचे काम करणारे ढोर समाजाचे सटवाजी कावळे त्या काळात यांचीही काही जागा होती. ती या दोघांकडून १७५ एकर जमीन विकत घेण्यात आली. पी.ई.एस. च्या फंडातून जमिनीच्या खरेदीसाठी पैसे दिल्याची नोंद आहे. हैद्राबाद निजाम सरकारने मिलिंद कॉलेजसाठी एक कोटी रूपयाच्या शेड्युल्ड कास्ट ट्रस्ट फंडातून १२ लाख रुपये बिनव्याजी कर्ज देऊन औरंगाबादला पी.ई.एस. सोसायटीचे महाविद्यालय सुरू केले. उपकरणे व फर्निचर खरेदीसाठी तीन लाख रु. खर्च केले. इमारतीसाठी ९ लाख रु. खर्च करण्यात आले. या बिनव्याजी कर्जाचा उल्लेख डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कोनशिला भाषणातही केला होता.

कर्ज दिल्याबद्दल फंडाच्या बोर्डाचा मी आभारी आहे. वार्षिक ५०,००० रुपयांच्या हप्त्याने हे कर्ज फेडावयाचे आहे. ही गोष्ट सोसायटीच्या दृष्टीआड करता येणार नाही. ही परतफेड इ. स. १९५६ पासून सुरू होणार आहे.

**मिलिंद महाविद्यालयाची स्थापना आणि शैक्षणिक सुरुवात :**

इ. स. १९५० पासून पी.ई.एस. औरंगाबादचे पहिले महाविद्यालय 'मिलिंद महाविद्यालय' या नावाने सुरू झाले." महाविद्यालाच्या इमारतीचा कोनशिलेचा समारंभदिनांक १ सप्टेंबर १९५१ रोजी भारताचे तत्कालीन राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या हस्ते झाला. या समारंभाला हैद्राबादचे निजामही हजर होते. विशेषतः या समारंभाला संपूर्ण देशभरातून तसेच महाराष्ट्रातून एक लाखापेक्षाही जास्त लोक हजर होते.

**मिलिंद महाविद्यालयाच्या मागील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका:**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मराठवाड्यात शिक्षणाची सुविधा विशिष्ट जातीसाठी किंवा फक्त मुलांसाठीच नव्हती. तर या महाविद्यालयात सर्व जातीधर्माची मुले व मुली शिक्षण घेणार होते. कोनशिला भाषणातच त्यांनी मुलींच्या शिक्षणाबाबत म्हटले होते की, 'नमुद करण्यासारखी गोष्ट म्हणजे या कॉलेजमध्ये मुलांच्या बरोबरच मुली ही शिक्षण घेत आहेत." सामाजिक मागासलेपणा व शिक्षणाचा गंधही नसलेल्या या भागात मुलांच्या बरोबरीने मुलींनाही शिक्षण देऊन महाविद्यालय एक पायंडा पाडत आहे. मुलीच्या शिक्षणाला उत्तेजन मिळावे, कॉलेज त्यावेळी मूळ शहराबाहेर असल्यामुळे व मोठ्या संख्येने मुला मुलींनी महाविद्यालयात येता यावे म्हणून शहरापासून महाविद्यालयापर्यंत येण्याकरिता एक बसही ठेवली होती. या महाविद्यालयात सर्व धर्मियांना प्रवेश खुले आहेत. येथे कुठल्याच प्रकारची जातीयता नाही. विद्यार्थ्यांत प्रज्ञा, शील, करुणा निर्माण करणे हे महाविद्यालयाचे ध्येय आहे. हे स्पष्ट करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुढे म्हणतात की, "अस्पृश्य व मागासलेल्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाकडे हे महाविद्यालय जातीने लक्ष पुरविल, ज्याची चिन्हे आताच आपण पाहत आहोत. खालचा वर्ग व वरचा वर्ग यांच्यातील संभाव्य संघर्ष टाळायचा असेल तर सर्व महाविद्यालयानी हेच करावयास हवे. अस्पृश्य विद्यार्थ्यांची संख्या हळूहळू वाढत आहे व सध्या महाविद्यालयामध्ये २६ अस्पृश्य विद्यार्थी असून त्यात विद्यार्थीनीचाही समावेश आहे. महाविद्यालयाच्या एका वर्षाच्याच प्रगतीवरून अशा प्रकारच्या

महाविद्यालयांची या भागात असलेली उणीव भरून निघाली आहे हे सिद्ध होते. आज विद्यार्थ्यांची संख्या ३३२ असून जागेच्या अभावी पहिल्या वर्षाच्या वर्गाकरिता प्रवेश बंद करणे भाग पडले आहे.

**मिलिंदच्या ग्रंथालयाची महत्त्वाकांक्षी योजना :**

मिलिंद महाविद्यालयाची स्वतःची ग्रंथालय उभारण्यासाठी त्यांनी एक महत्त्वाकांक्षी योजना आखली होती. डॉ. बाबासाहेब नेहमीच म्हणत 'ज्ञान संपादन करणे मनुष्याचे एक आद्य कर्तव्य आहे'. माझ्या या ग्रंथालयामुळे बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना ज्ञान संपादन करण्याच्या बाबतीत कुठलीही अडचण जाणवणार नाही. म्हणूनच सर्व विषयांच्या विपुल अशा ग्रंथानी मी ती परिपूर्ण अशी करणार आहे."

हे करण्यासाठी त्यांनी निजाम सरकारच्या ताब्यात असलेली हिमायतबाग व सध्याचे मेडिकल कॉलेज नबाबंडा रिझर (मादीचा महाविद्यालय परिसर) विकत घेण्याच्या हेतूने निजाम सरकारातील मेहंदी अलीयावर जंग यांच्याशी पत्रव्यवहार करून ४०,००० रुपयांत या जागेची त्यांची मागणी केली होती. हिमायत बागेची जागा मिळाल्यास तेथे 'कृषी महाविद्यालय' काढण्याचा त्यांचा विचार होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या योजनेत अनेक अफलातून योजना होत्या. आम्रवन निर्माण करणे, बुद्ध विहार बांधणे, गेस्ट हाऊस बांधणे, कॉलेज भोवताली मोठी बाग निर्माण करणे यापैकी काही योजना प्रत्यक्षात आल्या. काही आल्या नाहीत.

**सारांशः**

मराठवाडा हा भाग निजामी संरजामी राजवटीच्या अधिपत्याखालील मागास राहिला आहे. त्यातील बहुजन समाज हा तर या प्रतिगामी राजवटीमुळेच अती मागास राहिला होता. शिक्षणाशिवाय बहुजनांच्या स्थितीत बदल होणे संभव नाही हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ओळखले होते. मराठवाडा विभागाचा विकास याचा एक आकृतिबंध त्यांनी तयार केला होता. या विभागाचा औद्योगिक व शैक्षणिक विकासासाठी त्यांनी औरंगाबाद रोटरी क्लब येथील भाषणात मराठवाडा विभागाच्या विकासासंबंधी काही प्रश्न ही उपस्थित केले व योजना मांडल्या आहेत.

बहुजनांच्या शिक्षणाच्या चळवळीत बाबासाहेब आंबेडकर यांची अत्यंत महत्वपूर्ण भूमिका असलेली निदर्शनास येते त्यांची बहुजन समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी अडसर असणारी गोष्ट म्हणजे 'शिक्षणांचा विकास' ही बाबासाहेबांच्या लक्षात आली.

त्यासाठी त्यांनी बहुजन समाजाच्या शिक्षणाच्या चळवळी, बहुजनांच्या शिक्षणासाठी शासनाला महत्त्वपूर्ण सुजना केल्या. त्यानंतर मराठवाड्यात पीपल्स एज्युकेशन सोसायटीची केलेली स्थापना, मराठवाड्यातील

विविध ठिकाणी सभा घेऊन सांगितलेले शिक्षणाचे महत्त्व, मिलिंद महाविद्यालयाची निजामांकडून कर्ज घेऊन स्थापना केली. मिलिंद महाविद्यालय स्थापना करण्यामागील त्यांची बहुजन शिक्षण क्रांतीची भूमिका तसेच महाविद्यालयातील इतर सुख-सुविधा, त्यात प्रामुख्याने स्वतंत्रपणे ग्रंथालयाची केलेली स्थापना महत्त्वाची होती. एकूणच मराठवाड्यातील शैक्षणिक क्रांतीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भूमिका अत्यंत प्रेरणादायी आहे.

**संदर्भ** :


१. वराठे बळवंत हनुमंत, (१९८८) : डॉ. आंबेडकरांचा सांगती, श्री. विद्या प्रकाशन, पुणे.

२. कठारे अनिल वाघमारे महादेव, (२००६) : हैदराबादचा स्वातंत्र्य संग्राम आणि मराठवाड्यातील बहुजन चळवळ, कल्पना प्रकाशन, नांदेड.

३. झेलीएत एलिनोर, (२०१०) : फ्रॉम अंटचेबल्स टू बहुजन्स एसेज ऑन द आंबेडकर मुव्हमेंट, मनोहर पब्लिकेशन, न्यू दिल्ली.

४. निंबाळकर वामन, (२००७) : सामाजिक क्रांतीची दिशा, प्राचार्य म. भि. चिटणीस समग्र वाङ्मय प्रबोधन प्रकाशन, नागपूर.

५. निकुंभ सी. एच., (२००५), समाज प्रबोधनकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सगावा प्रकाशन, पुणे.

६. भगत दत्ता, व इतर (१९९९) : परिवर्तनः संकल्पना वेध आणि वास्तव, डी. जे. एम. वाघमारे, गौरव ग्रंथ, कल्पना प्रकाशन, नांदेड.

७. राव अनुपमा, (२०११) : द कास्ट क्वेश्चन : बहुजनाज अँड द पोलिटिक्स, ऑफ माडर्न इंडिया, युनिवर्सिटी ऑफ कालीफोर्निया प्रेस पर्मन्ट ब्लाक, न्यू दिल्ली.

८. पगारे, के. डी. (२०१२) : केळीच्या पानावरील उष्टावळ, कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद.

९. खरात शंकरराव, (संपा.) (१९९०) : डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रे, इंद्रायणी साहित्य पुणे.

१०. किर धनंजय, (१९९३) : डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

११. व्यंकटस्वामी पी. आर. (१९५५) : आवर स्ट्रगल फॉर इम्यान्शिस्पेशन, व्हाल्यूम १-२-३ युनिवर्सल आई प्रिंटर्स, सिकंद्राबाद.

१२. डोंगरे असाराम मोहनलाल, (२००५) : मी अनुभवलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर, प्रज्ञा प्रकाशन, औरंगाबाद.

१३. आंबेडकर सविता, (१९९०) : डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सहवासात, तथागत प्रकाशन, ठाणे.

१४. भालेराव अनंत, (२००१) : हैद्राबाद स्वातंत्र्य संग्राम आणि मराठवाडा, मौज प्रकाशन, मुंबई.

१५. क्षीरसागर रा. का., (२००६) भारतीय रिपब्लिकन पक्ष, कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद

International Research Journal
IJNRD
Research Through Innovation